# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक 25 जुलै, 2013
## (सकाळी 10.00 ते 12.00 वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम 101 अन्वये) -**

**(बुधवार, दिनांक 24 जुलै, 2013 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) - (क्रमांक 1 व 2)**

(1) **श्रीमती शोभाताई फडणवीस वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"देशातील सिकलसेल आजाराच्या समूळ उच्चाटनासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानात या आजाराचा समावेश करणे, परंतु विदर्भातील 11 जिल्ह्यांसह 19 जिल्हे प्रभावित करणाऱ्या सिकलसेल आजारावर राज्य शासनाची नियंत्रण संस्थाच स्थापन न होणे, सिकलसेल रुग्णांना केव्हाही व कुठेही उद्‌भवणारा सिकलसेल क्रायसिस टाळण्यासाठी नियमित व ठराविक वेळेत प्रत्येक रुग्णांची आरोग्य तपासणी, जिल्हा रुग्णालय व शासकीय मेडिकल कॉलेजमध्ये डे केअर सेंटर, प्रत्येक रुग्णांला विशेष प्रकारची आरोग्य पुस्तिका, उपचार व आरोग्य तपासणीकरिता एसटी प्रवास भाड्यात सवलत, तसेच, या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी 90 दिवसांच्या आत सिकलसेल नियंत्रण संस्था स्थापन करण्याचे आदेश राज्याच्या लोकायुक्तांनी 20 एप्रिल, 2011 रोजी देऊनही त्यांची पूर्तता आजतागायत न होणे, शासनाच्या या उदासिन धोरणामुळे सर्वसामान्य जनतेत पसरलेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(2) **डॉ. रणजित पाटील,** श्री. नागो गाणार **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंधारण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर येथील गेल्या एक वर्षापासून सुरु असलेले अंबापूर धरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असणे, नुकत्याच दिनांक 14 जून रोजी झालेल्या पावसामुळे अंबापूर धरणाची मुख्य भिंत फुटून शेतकऱ्यांचे कोट्यावधी रूपयांचे नुकसान होणे, धरणातील पाणी लगतच्या शेतात साचल्याने शेतीतील पिक, रखडून गेले असणे, शेतातील विहीरी खचल्या असणे, शेतीतील अवजारे व पाईप धरणाच्या पाण्याने वाहून गेले असणे, बागायती शेतीची मोठ्या प्रमाणात हानी झाली

असणे, शेतात खड्डे पडले असणे, संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारांवर कुठल्याच प्रकारची कार्यवाही झाली नसणे, तसेच, नुकसान भरपाई मिळाली नसणे, यामुळे शेतकऱ्यांच्या मनात शासनाप्रती झालेली तीव्र संतापाचा भावना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

(3) **श्री. रामदास कदम वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई उपनगरातील कांदिवली (प.) येथील न.भू.क्र.128/ए/59/1 या जमीनीवर मुंबई क्रिकेट असोसिएशन प्रस्तावित क्रिकेट ॲकॅडमी क्रीडा मनोरंजन संकुल, या खेळांच्या मैदानावरील बांधकामाबाबत राज्य शासनाने दिनांक 15 मे, 2000 ते 4 जुलै, 2003 पर्यंत देण्यात आलेली स्थगिती, त्यानंतर दिनांक 7 ऑगस्ट, 2003 ते 1 डिसेंबर, 2007 पर्यंत खेळाच्या मैदानावरील बांधकामावरील स्थगिती उठविणे, व सन 2007 ते आजमितीपर्यंत पुन्हा स्थगिती लागू करण्यात येणे, महानगरपालिकेच्या दिनांक 23 एप्रिल, 2004 च्या ठरावान्वये क्रिकेट ॲकॅडमी क्रीडा मनोरंजन संकुल येथे बांधकाम करण्याकरिता मंजूरी मिळणे, मात्र, त्यानंतर अन्य कोणत्याही खेळाच्या मैदानावरील बांधकामास परवानगी न मिळणे, पी.जी. प्लॉटवर नियमाप्रमाणे 15 टक्के बांधकाम करण्यास परवानगी असताना 23 टक्के बांधकाम करणे, महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे व विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे सदर संस्थेस क्रीडा संकुलात विविध सुखसुविधांसह बांधकामास परवानगी देण्यात येणे, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मैदानावर कोणतेही बांधकाम करू नये असे आदेश असताना सदर संस्थेने जिमखना/ क्लब क्रीडागार, तरणतलाव, जिम्नॅशियम, एक कार्ड हॉल, तीन रेस्टॉरंट, दोन दारूचे बार, विविध परदेशी खेळांसाठी हॉल अशाप्रकारे 23 टक्के बांधकाम करणे, मार्गदर्शक नियमावलीप्रमाणे क्लब हाऊसच्या सभासदांकडून सदस्यत्व फी 50,000/- रूपये असे बंधन असतांना या संस्थेने स्थानिकांना किंवा परिसरातील रहिवाश्यांना सभासत्व न देता या संस्थेच्या संलग्न असलेल्या क्लबना सुमारे 7 ते 10 लाखात सभासत्व बहाल करणे, महापालिकेने काळजीवाहू तत्वावर हा भूखंड दिलेला असतांनाही मैदानाच्या कोणत्याही प्रवेशद्वारावर बृहन्मुंबई महापालिका प्रशासनाचा फलक व बोधचिन्ह लावण्यात न येणे, या संदर्भात शासनाने केलेली व करावयाची तातडीने कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(4) **श्री. मोहन जोशी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे

**मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"परिवहन विभागाने दिनांक 15 जुलै, 2013 रोजीपासून वाहन नोंदणी, परमिट, बॅच, अपील यासह विविध प्रकारच्या शुल्कांमध्ये दुप्पट वाढ करणे, यामुळे माल वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या परमिट शुल्कात रुपये 200 वरून 600, खाजगी सेवा देणाऱ्या वाहनांच्या शुल्कात रुपये 200 वरून 400, नॅशनल परमिटमध्ये रुपये 300 वरून 700, तर मिटर तपासणीसाठी रुपये 2000 भरावे लागणार असणे, लायसन्स नुतनीकरणासाठी आता रुपये 200 ऐवजी 500 भरावे लागणार असणे, त्याचप्रमाणे, वाहनांवरील जाहिरात शुल्कापोटी माल वाहतूक करणाऱ्या वाहनावर रुपये 200 वरुन 2000 मोटारींवर रुपये 100 वरुन 1000 रूपये, रिक्षावर रुपये 60 वरून 500 इतके शुल्क वाढविण्यात आले असणे, परिणामी राज्यातील तमाम वाहन चालक, वाहन धारक, प्रवासी यांच्या मनात राज्य शासनाविषयी पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबतीत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना"

(5) **श्री. अनिल भोसले,** श्री. जयवंतराव जाधव **वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहरात उत्तर प्रदेशातून कोकेनची तस्करी होणार असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यानुसार पुणे येथील गुन्हेशाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने माहे मे, 2013 च्यासुमारास शिवाजीनगर एसटी स्टँडवर सापळा रचून या तस्करांना पकडण्यात येणे, त्यांच्याकडून 520 ग्रॅम कोकेन आणि दोन मोटारसायकली अशा सुमारे 52 लाखाचा ऐवज जप्त करण्यात येणे, पुणे शहर आणि परिसरात कोकेन सारख्या अंमली पदार्थाची विक्री होवू नये यादृष्टीने शासनाने तात्काळ प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

(6) **श्री जयप्रकाश छाजेड,** श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. संजय दत्त **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्रात सुतार, लोहार, कुंभार, सोनार, शिंपी, साळी, नाभिक, गुरब, भोइ्र, परीट, परदेशी, बेलदार इत्यादी जातीचा बारा बलुतेदारांमध्ये समावेश असून आजही या पारंपारीक पध्दतीच्या व्यवसायाच्या माध्यमातून ते स्थानिक समाजाची सेवा करीत असणे, बारा बलुतेदार हे पूर्वीपासून ग्रामिण भागात राहात असले तरी भूमीहीन असून त्यांना दिवसाकाठी मिळालेल्या मोलमजूरीवर उदरनिर्वाह करावा लागत असणे,

जागतिकीकरण व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात यांच्या उद्योगधंदयामध्ये इतरांनी शिरकाव केल्यामुळे काळाच्या ओघात त्यांचे उद्योगधंदे बुडणे, सामाजिक, आर्थिक, व्यवसायिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात हा वर्ग वंशपरंपरेने उपेक्षित व वंचित राहणे, परिणामी बारा बलुतेदार व त्यांच्या कुटुंबियांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, या सर्व बाबीं विचारात घेता राज्यातील बारा बलुतेदारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापून त्यांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास इत्यादी विविध बाबींमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही वा उपययोजना."

(7) **श्री. दिवाकर रावते वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मार्च-एप्रिल, 2013 मध्ये राज्यातील प्राध्यापकांनी संप करणे, सदर संप काळातील प्राध्यापकांना पगार न देण्याचा राज्य शासनाचा निर्णय, या संपकाळातील पगार देण्याची प्राध्यापकांनी आग्रही मागणी करणे, मोठ्या उन्हाळी सुट्टी अगोदर तीन महिने विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम न केल्यास सुट्टीचा कालावधी हा पगारासाठी ग्राह्य धरला जाऊ नये असे शासनाचे आदेश/ मार्गदर्शक तत्वे/ सूचना असणे, त्यामुळे संपकाळातील पगार देण्याची प्राध्यापकांची मागणी उचित नसणे, संपकाळातील प्राध्यापकांना पगार दिल्यास अशाच प्रकारची मागणी अन्य विभागातील तसेच खाजगी संस्थेतील संपकरी कर्मचारी/ कामगार यांचेकडून होण्याची भीती असणे, शासनाने प्राध्यापकांच्या संपकाळातील वेतन देण्याच्या मागणीबाबत कडक भूमिका घेण्याची आवश्यकता, या संदर्भात शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

## (दुपारी 12.15 वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(1) **मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री** : "आयुर्वेद, होमिओपॅथी अभ्यासक्रमाच्या खाजगी संस्थाच्या मॅनेजमेंट कोट्याच्या फी रचनेच्या स्वरुपाबाबत" या विषयावरील डॉ.दिपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.रामनाथ मोते, श्री.नितीन

गडकरी, श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. आणि श्री.अनंत तरे, श्री.अरविंद सावंत, श्री.विलास अवचट, श्री.अनिल परब, डॉ.अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर, माजी वि.प.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 9354 ला दिनांक 12 डिसेंबर, 2005 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(2) **मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : "बुलढाणा जिल्ह्यात भ्रृणहत्या होत असल्याबाबत" या विषयावरील श्रीमती विद्या चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.रमेश शेंडगे, श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 38120 ला दिनांक 19 मार्च, 2013 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**तीन : (अ) म.वि.प. नियम 93 अन्वये सूचना - असल्यास.**

**(ब) म.वि.प. नियम 93 अन्वये निवेदन - असल्यास.**

**चार : म.वि.प. नियम 101-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

**पाच : शासकीय विधेयके :-**

**(1) विचार पुढे सुरू, खंडश: विचार व संमत करणे -**

सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 8 - महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, 2013.

**क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 8 - महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, 2013 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 47 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा

अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(2) **विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 7 - महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, 2013.

क) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 7 - महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, 2013 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 47 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 7 - महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, 2013 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 45 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 7 - महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, 2013 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 40 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(3) **विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

**(अ)** सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 9 - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, 2013

**(ब)** सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 20 - महाराष्ट्र कृषी विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2013

**(क)** सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 21 - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2013

**सहा : म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्ताव -**

**(बुधवार, दिनांक 24 जुलै, 2013 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला प्रस्ताव) -**

(अ) **सर्वश्री.विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजीत पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्ताव -**

"गत दीड वर्षापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये सिंचनाचे विविध घोटाळे पुराव्यानिशी सभागृहात मांडूनदेखील त्याबाबत साधी चौकशी करण्याची बाबदेखील शासनाकडून मान्य करण्यात न येणे, सिंचनामध्ये झालेला भ्रष्टाचार मान्य न करता घोटाळयाची रंगसफेदी करणारी श्वेतपत्रिका शासनाकडून काढण्यात येणे, वस्तुस्थितीवर आधारित श्वेतपत्रिका नसल्याने हिवाळी अधिवेशन, 2012 मध्ये सलग 5 दिवस विरोधी पक्षाने सभागृहात आक्रमक भूमिका घेतल्यामुळे या संपूर्ण घोटाळयाची एस.आय.टी. मार्फत चौकशी करण्याचे मान्य करण्यात येणे, सदर एस.आय.टी. ची स्थापना कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गत असावी व एस.आय.टी. च्या कार्यकक्षेमध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश असावा याबाबतचे पत्र मा.मुख्यमंत्री महोदयांना विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांच्यामार्फत देण्यात येणे, प्रत्यक्षात मात्र एस.आय.टी. स्थापन करताना कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गत समितीची स्थापना करण्यात न येणे, समितीच्या अध्यक्षांना विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी सिंचन घोटाळयाची काही कागदपत्र तपासाकरिता सादर करण्याबाबत पत्र दिले असता समिती अध्यक्ष श्री.चितळे यांनी समितीला तसा अधिकार नसल्याचे प्रतिपादन करणे, ही बाब लक्षात घेवून सिंचनातील भ्रष्टाचार बाहेर पडण्यासाठी श्री.चितळे यांनी सर्व प्रकारच्या तक्रारी चौकशी करण्याची मागणी तसेच एस.आय.टी. ची कार्यकक्षा बदलण्याची मागणी सभागृहात करणे, परंतू शासनाकडून कोणताही प्रतिसाद न मिळणे, शासनाकडून याबाबत सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत शासनाच्या भूमिकेबाबत कोट्यावधी जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम, सिंचन गैरव्यवहाराचा योग्यरितीने तपास होण्यासाठी एस.आय.टी.च्या

कार्यकक्षेत व रचनेत बदल करण्याची आवश्यकता, विचारात घेण्यात यावी."

**(बुधवार, दिनांक 24 जुलै, 2013 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला प्रस्ताव) -**

(ब) **सर्वश्री.माणिकराव ठाकरे,** सुभाष चव्हाण, हेमंत टकले, शरद रणपिसे, प्रकाश बिनसाळे, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री विक्रम काळे, मोहन जोशी, संजय दत्त, राणाजगजितसिंह पद्मसिंह पाटील, सय्यद मुझफ्फर हुसेन, प्रा.सुरेश नवले **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्ताव -**

" लोकांना स्वस्तात धान्य देण्याची लोक कल्याणकारी योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाने माहे जुलै, 2013 मध्ये जारी केलेला अन्न सुरक्षा अध्यादेश या योजनेमुळे देशातील सुमारे 70 कोटी जनतेला दरमहा रु.3 प्रमाणे 5 किलो तांदूळ, रु.2 प्रमाणे 5 किलो गहु व रु.1 प्रमाणे 5 किलो कडधान्य मिळणार असून, देशातील 67 टक्के लोकांना अन्नाची सुरक्षितता यामधून मिळणार असणे, माणसाच्या मूलभूत गरजांपैकी अन्न या मुलभूत गरजेचा अधिकार अन्न सुरक्षा अध्यादेश जारी करुन लोकांना देण्यात येणे, केंद्र सरकारने दिलेल्या मुदतीच्या आत ही योजना सुरू करण्यात येणार असणे, महाराष्ट्रातील 75 टक्के ग्रामीण व 50 टक्के शहरी लोकांना तसेच, शालेय विद्यार्थ्यांना या योजनेतून कमी दरात अन्न पुरवठा होणार असणे, ही योजना राज्यात राबविताना सर्व मुलभूत बाबींची पुर्तता राज्य शासनाला करावी लागणार असणे, त्यात धान्याची वितरण व्यवस्था, धान्य साठविण्यासाठी गोदामांची गरज इत्यांदीची व्यवस्था करणे गरजेचे असणे, धान्याच्या वितरणासाठी वाहनांची व्यवस्था, तसेच, धान्य उत्पादन ते वितरण या साखळीतील प्रत्येक कच्चा दुवा सुधारण्याची आवश्यकता असणे, राज्यात ग्रामीण, दुर्गम, मागास भागातील लोकांपर्यंत व सर्व लाभार्थ्यांपर्यंत अन्नधान्याचा पुरवठा व्हावा यासाठी सक्षम यंत्रणा उभी करावी लागणार असून, प्रत्येक लाभार्थ्याला या योजनेचा सुलभतेने व वेळेत लाभ मिळावा यादृष्टीने अन्न सुरक्षा योजनेची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपायोजना, विचारात घेण्यात यावी."

(क) **सर्वश्री विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस,

डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्ताव -**

"कोरड्या दुष्काळामुळे गतवर्षी शेतकरी अडचणीत आला असताना यावर्षी अतिवृष्टीमुळे वर्धा, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ व रत्नागिरी इत्यादी जिल्ह्यांसह बऱ्याचश्या जिल्ह्यातील नागरिकांच्या घराचे, शेतीचे व जनावरांचे अपरिमीत नुकसान होणे, एवढेच नव्हे तर बऱ्याच नागरीकांना या आपत्तीमध्ये जीव गमवावा लागणे, या जिल्ह्यांमधील लक्षावधी शेतकऱ्यांची शेती व या शेतीवरील नुकतेच पेरलेले पीक या अतिवृष्टीमुळे वाहून गेल्यामुळे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होणे, शेतकऱ्यांचे न भरुन येणारे नुकसान झाल्यामुळे शासनाने ओला दुष्काळ जाहीर करण्याची आवश्यकता, परंतू शासनाकडून याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही घोषणा न होणे, सलग दुसऱ्यावर्षीच्या गंभीर कोरड्या दुष्काळामुळे कोट्यावधी कोरडवाहू व बागायती शेतकऱ्यांचे अब्जावधी रुपयांचे नुकसान होणे, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत न करता शासनामार्फत केवळ कंत्राटदारास लाभ होईल अशा चारा छावण्या व टँकरसाठी बहुतांश निधी खर्च करण्यात येणे, चारा छावण्या व चाराडेपोमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची बाब सभागृहात मांडल्यानंतर या प्रकरणाची 15 दिवसात सीआयडी चौकशी करण्यात येईल असे आश्वासन सभागृहात देण्यात येणे, परंतू अद्यापपर्यंत या प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात न येणे, दुष्काळ निवारणासाठी केलेल्या बहुतांश घोषणांची अंमलबजावणी न होणे, सद्यस्थितीत काही ठिकाणी चांगला पाऊस झाल्यामुळे काही नद्यांमध्ये बरेचसे पाणी आले असले तरी नद्यांमधील प्रदुषणाची पातळी वाढल्यामुळे कृत्रिम दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होणे, शासनाने हा दुष्काळ निवारणासाठी धोरणात्मक निर्णय न घेता तात्पुरती मलमपट्टी केल्याने परत राज्याला दुष्काळाला सामोरे जावे लागल्यास गंभीर संकट निर्माण होण्याची शक्यता असणे, पीककर्ज, बि-बियाणे, कोरडवाहू शेती अभियान इत्यादी योजनांमध्ये असलेल्या त्रुटींमुळे कोट्यावधी शेतकरी अडचणीत येणे, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, विचारात घेण्यात यावी."

सात : **अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम 92 अन्वये- (बैठकीच्या शेवटी) -**

(1) **श्री.रामनाथ मोते व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"इंग्रजी माध्यम वगळता अन्य माध्यमातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी संख्या दिवसेंदिवस कमी होणे, माध्यमिक शाळांसाठी तुकड्या टिकवण्यासाठी विद्यार्थी संख्येचे निकष शिथिल करण्याचा धारेणात्मक निर्णय घेणे, या निर्णयातून प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा वगळणे, शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने तुकड्यांची संकल्पना रद्द होणे, पटावरील विद्यार्थी संख्येच्या आधारे संच मान्यता न होणे, शिक्षण हक्क विधेयकाची अंमलबजावणी न होणे, प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील तुकड्या टिकविण्याचे निकष शिथील करण्याबाबत वारंवार विनंती करुनही शासनाने दखल न घेणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(2) **श्री.जयंत पाटील व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील विजेची मागणी व पुरवठा यामध्ये तफावत पाहता अपारंपारिक ऊर्जेचाही वापर करणे आवश्यक असणे, राज्यातील ग्रामीण भागाला पर्यावरण संतुलन प्रणित मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने आणि भारनियमन टाळून विनाव्यत्यय अपारंपारिक स्त्रोतातून निर्मिती वीजेचा पुरवठा होण्यासाठी ग्रामीण भागातील रस्त्यांवर सौर पथ दिव्यांचे खांब बसविण्याच्या प्रस्तावास शासनाने मान्यता देणे, या योजनेसाठी सन 2010-11 या आर्थिक वर्षासाठी राज्य निधीतून रुपये 9.00 कोटीचा निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचे अधिनस्त ठेवण्यात आलेला असणे, तसेच दिनांक 31-3-2011 रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट ॲथॉरिटीच्या दरकरार सूचितील पर्ल एन्टरप्रायझेस, पुणे व कृषी सोलर, पुणे या दोन एजन्सी पात्र ग्रामपंचायतीमध्ये सौर पथ दिवे स्थापित करण्यासाठी नेमण्यात येणे, राज्यामध्ये सुमारे 700 कंपन्यांपैकी 70 कंपन्यांनी रुपये 10 लाख भरुन रेट कॉन्ट्रक्टमध्ये नोंदणी केली असता राज्यातील फक्त पर्ल एन्टरप्राईझेस, पुणे व कृषी सोलर, पुणे याच दोन कंपन्यांचा विचार करण्यात येणे, तथापि अन्य कंपन्यांचा विचार करण्यात न येणे, सन 2010-11 या आर्थिक वर्षासाठी राज्य निधीतून उपलब्ध झालेल्या रुपये 9.00 कोटी निधीमधून आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली व किती ठिकाणी सोलर लाईट पुरविण्यात आलेले असणे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : 24 जुलै, 2013.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.